क्रमांक : का.स./बैठक/२१४

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २० फेब्रुवारी, २००६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १ फेब्रुवारी, २००६ (बुधवार) रोजी झालेल्या २१४ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

20.2.2006

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव, - अध्यक्ष
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर, - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे, - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री. हरिशंकरन्, - सदस्य
कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

प्रधान सचिव (१), - सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## कार्यकारी समितीच्या २१४ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १ फेब्रुवारी, २००६ (बुधवार) |
| वेळ | : | सकाळी ११.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री.रा.मे.प्रेमकुमार<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.एन.रामाराव<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.अशोक सिन्हा<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| डॉ.टी.चंद्र शेखर<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

<u>निमंत्रित</u> :

श्रीमती शर्वरी गोखले
प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अड्सुमली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**<u>बाब क्र.१</u> : <u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २००५ रोजी झालेल्या २१३ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २००५ रोजी झालेल्या २१३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालील प्रमाणे चर्चा झाली :-

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत मरीन ड्राइव्ह परिसराचे तांबे चौक / चौपाटीपासून नरिमन पॉईंटपर्यंत पुनर्नूतनीकरणाच्या निविदेला मंजूरी देणेबाबत**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पुनर्नूतनीकरणाच्या कामाला सुरुवात झाली असून टप्पा-१ चे काम जुलै, २००६ पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

पुनर्नूतनीकरणाच्या कामासंबंधात सदस्यांनी अशा सूचना केल्या की, भूमिगत जलवाहिन्या व अन्य वाहिन्या यांच्या दोष निराकरणासाठी वरचेवर होणारे खोदकाम टाळण्यासाठी स्वतंत्र डक्टची व्यवस्था करण्याची शक्यता पडताळून पहावी. तसेच भूमिगत वाहिन्यांच्या दोष निराकरणासाठी करावयाच्या खोदकामानंतर पुनःस्थापनेच्या कामासंबंधात बृहन्मुंबई महानगरपालिकेने जी कार्यपध्दती निश्चित केली आहे त्या पध्दतीचा प्राधिकरणाकडील कामासाठी वापर करण्याबाबत विचार करण्यात यावा. त्याचप्रमाणे ज्या पृष्ठभागावर पेव्हर ब्लॉक बसवावयाचे आहेत तो पृष्ठभाग पुरेसा मजबूत आहे किंवा कसे याची निश्चिती करण्यात यावी.

चर्चेदरम्यान अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, भूमिगत वाहिन्यांच्या दोष निराकरणासाठी करावे लागणारे खोदकाम टाळण्यासाठी स्वतंत्र डक्टची तरतूद वरळी येथील समुद्र किना-याची धूप थांबविण्याच्या कामामध्ये अंतर्भूत करण्यात यावी.

**बाब क्र.७ : मिठी, दहिसर, पोयसर, ओशिवरा आणि उल्हास इत्यादी नद्यांचा अभ्यास सुरु करणेबाबत.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उल्हास नदीच्या अभ्यासात भूसर्वेक्षण करण्यासाठी कार्यकारी समितीने तत्वतः मान्यता दिलेली आहे. आता या भूसर्वेक्षणाचा खर्च

..४/-

सुमारे रु.१.०२ कोटी इतका येणार आहे आणि सदर सर्वेक्षण फेब्रुवारी, २००६ मध्ये सुरु होणार आहे.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या एअरपोर्ट जंक्शन ते अंधेरी उड्डाणपूल या पॅकेज क्र.३ च्या उर्वरित कामासाठी मागविलेल्या फेरनिविदेस कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने हाती घेतलेल्या मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या एअरपोर्ट जंक्शन ते अंधेरी उड्डाणपूल या पॅकेज क्र.३ च्या कामासाठी मे.एस.पी.एम.एल यांची ठेकेदार म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्या दराप्रमाणे अंदाजित खर्चापेक्षा १०% कमी दराने सदर काम त्यांना देण्यात आले होते. परंतु कामाची प्रगती मंद असल्यामुळे निविदा शर्तीनुसार हे काम त्यांच्याकडून काढून घेण्यात आले व उर्वरीत कामाच्या निविदा सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन मागविल्या. त्यास प्रतिसाद म्हणून प्राप्त झालेल्या एकूण ३ निविदांपैकी मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची लघुत्तम निविदा उर्वरीत कामाच्या रु.१७.७० कोटी इतक्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९८% कमी असून उर्वरित २ निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा सुमारे ९% जास्त दराच्या आहेत. निविदेतील अटीनुसार, निविदाकाराने डांबराचे १०,००० घनमीटर एवढे काम एका वर्षात करणे आवश्यक आहे. मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी सुमारे ४,००० घनमीटर इतकेच काम एका वर्षात केले असले तरीही ते पॅकेज क्र.४ मध्ये याचप्रकारचे काम करीत असल्यामुळे निविदेतील अट शिथिल करुन त्यांना काम देण्याची शिफारस करण्यात आली आहे. तथापि, सदर निविदाकाराकडून निविदेतील अटीनुसार जादा सुरक्षा रक्कम घेण्यात येईल व सदर काम मुदतीत पूर्ण करण्याचे हमीपत्र निविदाकाराकडून घेण्यात येईल. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार सदर काम तातडीने सुरु करणे आवश्यक असल्यामुळे, अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या मान्यतेने मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा

११.९८% कमी म्हणजे रु.१५,५७,९५,४००/- किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात आला आहे व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केली आहे.

**३.२** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.९८०</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या एअरपोर्ट जंक्शन ते अंधेरी उड्डाणपूल या पॅकेज क्र.३ मधील उर्वरीत कामासाठी मे.सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९८% कमी म्हणजे रु.१५,५७,९५,४००/- (रुपये पंधरा कोटी सत्तावन्न लाख पंच्याण्णव हजार चारशे मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.४</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) – महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्राधान्यक्रमाने हाती घेतलेल्या बर्फीवाला येथील उड्डाणपूलाच्या लघुत्तम निविदेला मान्यता देणेबाबत.</u>**

**४.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत बर्फीवाला लेन येथील उड्डाणपूलासाठी यापूर्वी निविदा मागविल्या

होत्या. त्यावेळेस प्राप्त झालेला लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२३% जास्त दराचा होता. वाटाघाटीनंतरही निविदाकाराने या देकारातील दर कमी केला नाही. त्यामुळे सदर बांधकामाच्या फेरनिविदा मागविण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या कामातील विविध अडचणींचा आढावा घेऊन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले व फेरनिविदा मागविल्या. सुधारीत अंदाजपत्रकानुसार या उड्डाणपूलाचा अंदाजित खर्च रु.२२३९.०२ लाख इतका आहे. एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी मेसर्स जे.कुमार अँड कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९९% जास्त दराची निविदा लघुत्तम असल्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या लघुत्तम निविदेची शिफारस करुन प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी पाठविली. तथापि, सदरील देकार हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त असल्यामुळे लघुत्तम निविदाकाराशी वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटीनंतर सदर लघुत्तम निविदाकाराने मूळ देकार कमी करुन दिलेला सुधारीत देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराचा आहे. सदरील लघुत्तम देकार रास्त व निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**४.२** या कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पूर्वी तयार केलेला अंदाजित खर्च व त्यांचा आताचा सुधारीत अंदाजित खर्च यामधील वाढीबाबत, श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, अंदाजित खर्चातील वाढ ही प्रामुख्याने काही बाबींच्या परिमाणातील व दरातील वाढीमुळे आहे. यासंबंधात श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे उड्डाणपूलाच्या बांधकामाबाबत पुरेसे तंत्रज्ञान व अनुभव असल्यामुळे प्राधिकरणाने त्यांची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नियुक्ती केली आहे, त्यामुळे वस्तुतः या महामंडळाने सुरुवातीस अंदाजित खर्च तयार करताना या कामातील विविध अडचणी विचारात घेणे आवश्यक होते. म्हणून याबाबतच्या योग्य त्या सूचना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास निर्गमित करण्यात याव्यात.

..७/-

**४.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९८१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत बर्फीवाला लेन येथील उड्डाणपूलाच्या कामासाठी मेसर्स जे.कुमार अँड कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराची म्हणजे रु.२३८५.९१ लाख (रुपये तेवीस कोटी पंच्याऐंशी लाख एक्याण्णव हजार मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावर सीएसटी विमानतळ (देशांतर्गत) येथे प्रस्तावित केलेल्या उड्डाणपूलाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या बृहत आराखडयामध्ये पश्चिम द्रुतगती महामार्गावर सीएसटी विमानतळ (देशांतर्गत) जंक्शन येथील उड्डाणपूलासाठी ढोबळ अंदाजपत्रकानुसार

रु.२४.०० कोटी इतकी तरतूद केली आहे. सुमारे ७०० मीटर लांबीच्या या उड्डाणपूलामुळे नेहरु रोड जंक्शन व विमानतळ जंक्शन ओलांडणे शक्य होईल. महाराष्ट राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या उड्डाणपूलाचे सविस्तर नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्यासाठी मेसर्स डार कन्सल्टंटस् या सल्लागार संस्थेची नेमणूक करण्याचा प्रस्ताव होता. तथापि, त्यास मूर्त स्वरुप न आल्यामुळे तत्पूर्वी नियुक्त केलेल्या मेसर्स टेक्नोजेम कन्सल्टंटस् लि. यांनीच या उड्डाणपूलाचे सविस्तर नकाशे व अंदाजपत्रके तयार केली आहेत. त्यानुसार या उड्डाणपूलाचा अंदाजित खर्च रु.३३.८५ कोटी इतका आहे. अंदाजित खर्चातील वाढ ही प्रामुख्याने ढोबळ अंदाजपत्रके व सविस्तर अंदाजपत्रके या दरम्यानच्या कालावधीत झालेल्या भाववाढीमुळे आहे. आता या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या उड्डाणपूलाचा खर्च असाईड (ASIDE) योजनेतून करावयाचा आहे. चर्चेत सहार रोडवरील कार्गोकडे जाणा-या चौकात उड्डाणपूल बांधण्याच्या प्रस्तावाच्या सद्यस्थितीबाबत विचारणा करण्यात आली असता महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सध्याच्या प्रस्तावाप्रमाणे सहार रोड वरील कार्गो चौक या मर्यादित लांबीमध्ये उड्डाणपूलाचे बांधकाम करावयाचे नसून सहार रोड व पश्चिम द्रुतगती महामार्ग यांच्या जंक्शनपासून सहार आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत उच्चस्तरीय मार्ग बांधण्याचा प्रस्ताव असून त्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९८२** :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे हाती घेतलेल्या प्राधान्यक्रम-१ मधील पश्चिम द्रुतगती महामार्गावर सीएसटी विमानतळ

(Domestic Airport) जंक्शन येथील उड्डाणपूलाच्या रु.३३.८५ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे. सदर प्रकल्पासाठीचा खर्च असाईड (ASIDE) निधीमधून करण्यात येईल."

**बाब क्र.६ :** **मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावर नवघर (मुलुंड) येथे प्रस्तावित केलेल्या उड्डाणपूलाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**६.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या बृहत आराखडयामध्ये पूर्व द्रुतगती महामार्गावर नवघर जंक्शन येथे पादचारी भूयारीमार्ग बांधण्याचा प्रस्ताव आहे. ढोबळ अंदाजपत्रकानुसार या कामाचा अंदाजित खर्च रु.१.५० कोटी इतका आहे. तथापि, या जंक्शनच्या पूर्वेकडे झालेली मोठी वसाहत व त्यामुळे या जंक्शनवर पूर्व द्रुतगती महामार्गास पूर्व व पश्चिम दिशेने छेदून जाणारी वाहनांची वाहतूक आदी विचारात घेऊन तसेच लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार, वाहन व पादचारी वाहतूकीचा प्रश्न एकत्रितपणे सोडविण्यासाठी पादचारी भूयारीमार्गाऐवजी ४.० मीटर उंचीचा उड्डाणपूल बांधण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून सविस्तर अंदाजपत्रकाप्रमाणे त्याचा खर्च सुमारे रु.९.१७ कोटी इतका आहे. या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव आता कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे.

**६.२** श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, प्रस्तावित उड्डाणपूल हा दक्षिण-उत्तर दिशेला महामार्गाच्या आखणीप्रमाणे असून त्यावरुन महामार्गावरील वाहनांची ये-जा होईल तसेच सध्याच्या जंक्शनवर पूर्व-पश्चिम दिशेने वाहनांची व पादचा-यांची ये-जा विना अडथळा होऊ शकेल.

**६.३** श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, उड्डाणपूल आदी बांधकामांच्या प्रस्तावासोबत स्थळदर्शक नकाशा जोडावा जेणेकरुन प्रस्तावातील तरतूदी अधिक स्पष्ट होऊ शकतील.

६.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९८३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे हाती घेतलेल्या प्राधान्यक्रम-१ मधील पूर्व द्रुतगती महामार्गावरील नवघर जंक्शन (मुलूंड) येथील उड्डाणपूलाच्या रु.९.१७ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**बाब क्र.७ : वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंत) वाढविण्याचे काम तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जुलै, २००५ च्या पूर परिस्थितीनंतर केंद्रीय जल व उर्जा संशोधन केंद्राने १०० वर्षातून एकदा येऊ शकणा-या उच्चतम पूराचे गणितीय अंदाज तयार केले असून त्याप्रमाणे मिठी नदी व वाकोला नाल्यातील जलमार्गाची खोली व रुंदी वाढविणे आवश्यक आहे. पूरस्थितीचा अभ्यास करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या सत्यशोधन समितीच्या शिफारशीप्रमाणे, वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदी व वाकोला नाल्यातील जलमार्गाबाबत केंद्रीय जल व उर्जा संशोधन केंद्राने सन १९७८ च्या अहवालानुसार शिफारस केलेली कामे प्राथम्याने पूर्ण करावयाची आहेत. यामधील उर्वरीत कामांपैकी स्लुईस प्रकारच्या जलद्वाराचे बांधकाम करणे या बाबीसाठी सविस्तर पर्यावरणीय व अन्य अभ्यास तसेच स्थापत्यीय संकल्पचित्र आदी संबंधीची कार्यवाही स्वतंत्रपणे हाती घेणेत येत आहे. कार्यकारी

समितीस आता सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकुलातील माहिम कॉजवे ते सीएसटी पूलापर्यंतच्या सुमारे ६ कि.मी. लांबीच्या व वाकोला नाल्याच्या सुमारे १.८ कि.मी. लांबीच्या जलमार्गाची रुंदी व खोली वाढवून सभोवतालच्या परिसरात संरक्षक भिंती, हरितपट्टे, धावण्यासाठी मार्गिका, दुतर्फा रस्ते, मरीन पार्क आदी निर्माण करुन मिठी नदी परिसराच्या पर्यावरणामध्ये सुधारणा करण्याच्या तरतूदी आहेत. त्याप्रमाणे अंदाजपत्रके तयार करुन निविदा मागण्यात आल्या आहेत. सदरील अंमलबजावणी दोन टप्प्यात करावयाची आहे. टप्पा-१ ची अंमलबजावणी जून, २००६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून टप्पा-२ मधील कामे जून, २००७ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रस्ताव आहे. टप्पा-१ व २ यासाठी येणा-या एकूण सुमारे रु.१३०.८१ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्प मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्यात येणार आहे. वांद्रे-कुर्ला संकुलाच्या बाहेरील भागातील मिठी नदीची कामे बृहन्मुंबई महानगरपालिका करणार आहे. तथापि, या दोन्ही भागातील कामांचे संनियंत्रण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण करेल.

**७.२** श्री.रामानंद तिवारी, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी स्पष्ट केले की, रु.१३०.८१ कोटी या अंदाजित खर्चात प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचा खर्च समाविष्ट नाही कारण झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत विनामूल्य उपलब्ध होणा-या सदनिकांमध्ये पात्र प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करावयाचे आहे.

**७.३** श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता श्री.देशिंगकर, मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी स्पष्ट केले की, केंद्रीय जल व उर्जा संशोधन केंद्राने सन १९७८ मध्ये केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी अंशतः पूर्ण झाली आहे. पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन, रुंदीकरणामुळे बाधित होणा-या तिवरांच्या झाडांच्या तोडणीसाठी मंजूरी तसेच पश्चिम रेल्वेवरील सध्याच्या पूलाच्या व अन्य पूलांच्या परिसरात पात्राची रुंदी व खोली वाढविण्यासाठी सर्व संबंधितांशी समन्वय साधून निर्णय घेणे आवश्यक आहे. मात्र याबाबत गंभीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता दिसत नाही. त्यानंतर, श्री.तांबे यांनी विचारणा केली असता श्री.देशिंगकर,

..१२/-

मुख्य अभियंता यांनी सादर केले की, रुंदीकरणाच्या व खोलीकरणाच्या कामाची मोजमापे ही काम सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतर लेव्हल पध्दतीने घेण्यात येतात. यासंबंधात श्री.तांबे यांनी अशी सूचना केली की, मोजमापे घेण्याच्या पध्दतीबाबतची टिप्पणी तयार करुन त्यांच्याकडे पाठविण्यात यावी.

७.४ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, मिठी नदी व वाकोला नाला यांच्या प्रस्तावित कामांसंबंधात, संबंधित पुनर्वसनाच्या कामासह, सविस्तर सादरीकरण कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत करण्यात यावे.

७.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९८४</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंत) वाढविणे व मिठी नदीचा परिसर विकसित करण्याच्या कामांसाठी रु.१३०.८१ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.८</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : तिमाही व्यवस्थापन अहवाल - दिनांक १ जुलै, २००५ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००५.</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक १ जुलै, २००५ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००५ पर्यंतच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.९ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक १ ऑक्टोबर, २००५ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००५.**

९.१ यासंबंधात श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकांबरोबर इतर वित्तीय संस्था व अनुसुचित बँकांमध्ये काही अटी व शर्तींच्या तसेच आर्थिक निकषाच्या अधीन राहून प्राधिकरणाने गुंतवावा. तसेच याबाबत शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा.

९.२ त्यानंतर, दिनांक १ ऑक्टोबर, २००५ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००५ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.१० : दिनांक ३० सप्टेंबर, २००५ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २००५ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.११ : वडाळा येथील भारवाहनतळ व आंतरराज्य बसवाहनतळ यांचे विकास आराखडा तयार करणे तसेच आंतरराज्य बसवाहनतळासाठी सखोल तांत्रिक - आर्थिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास करुन बांधा, वापरा व हस्तांतरण करा / सार्वजनिक - खाजगी सहभाग तत्वावर उभारणी करण्याकरीता सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.**

११.१ या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, डिसेंबर, २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने वडाळा भारवाहनतळ तसेच आंतरराज्य बसवाहनतळाचा विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. वडाळा भारवाहनतळाकडे गुंतवणूकदारांना

आकर्षित करण्यासाठी अशा विकास आराखडयाचा उपयोग होईल. वडाळा भारवाहनतळ आणि आंतरराज्य बसवाहनतळाचा विकास आराखडा तयार करण्यासाठी तसेच बांधा, वापरा व हस्तांतरण करा (BOT) / सार्वजनिक - खाजगी सहभाग (PPP) तत्वावर आंतरराज्य बसवाहनतळाची उभारणी करण्याच्या दृष्टीने तांत्रिक-आर्थिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती असलेल्या सल्लागारांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव आहे.

**११.२** वाहतूकीच्या उद्योगामध्ये कार्यरत असलेल्या वाहतूक कंपन्या व इतर कंपन्या / संस्था यांचे दक्षिण मुंबईतील गर्दीच्या क्षेत्रातून वडाळा भारवाहनतळ येथे स्थलांतर करण्यास वाहतूक कंपन्यांचा पूरेसा प्रतिसाद मिळालेला नाही असे श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी निदर्शनास आणून दिले असता, श्री. रामानंद तिवारी, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, वाहतूक कंपन्यांच्या स्थलांतरासंबंधात बहुतांश अडचणींचे निराकरण झाले असल्याने आता वाहतूक कंपन्या भारवाहनतळाकडे आकर्षित होतील अशी अपेक्षा आहे. यासंबंधात श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, वाहतूक कंपन्यांच्या स्थलांतरास गती मिळण्यासाठी महाराष्ट्र ट्रक टर्मिनल (स्थान नियंत्रण) अधिनियमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे.

**११.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९८५** :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबईतील वडाळा भारवाहनतळ व आंतरराज्य बसवाहनतळाचा विकास आराखडा तयार करण्यासाठी तसेच बांधा, वापरा व हस्तांतरण करा (BOT) / सार्वजनिक-खाजगी

सहभाग (PPP) तत्वावर आंतरराज्य बसवाहनतळाची उभारणी करण्याच्या दृष्टीने सखोल तांत्रिक-आर्थिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी जागतिक स्तरावरील निविदेद्वारे प्रस्ताव मागविण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : राष्ट्रीय उत्पादकता परिषद (N.P.C.) यांच्या अहवालानुसार वित्त व लेखा विभागात उप-मुख्य लेखा अधिकारी या संवर्गात दोन अतिरिक्त पदे व कनिष्ठ लेखा अधिकारी या संवर्गात तीन अतिरिक्त पदे निर्माण करणे.**

**१२.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, राज्य शासनाच्या आदेशानुसार प्राधिकरणाच्या सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या पदाचा आढावा घेण्याचे काम राष्ट्रीय उत्पादकता परिषदेला कार्यकारी समितीच्या मान्यतेने देण्यात आले होते. राष्ट्रीय उत्पादकता परिषदेने प्राधिकरणाच्या वित्त व लेखा विभागातील कामाचा आढावा घेतला आहे. प्राधिकरणाने मोठया प्रमाणात पायाभूत विकासाचे प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यामुळे प्राधिकरणातील कर्मचारीवर्गात वाढ झालेली असून वित्त व लेखा विभागाच्या कामातही वाढ झालेली आहे. तसेच प्राधिकरणास आयकरही लागू झालेला आहे. म्हणून राष्ट्रीय उत्पादकता परिषदेने सूचविल्याप्रमाणे वित्त व लेखा विभागात उप-मुख्य लेखा अधिकारी या संवर्गातील २ अतिरिक्त पदे व कनिष्ठ लेखा अधिकारी या संवर्गातील ३ अतिरिक्त पदे निर्माण करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच राष्ट्रीय उत्पादकता परिषदेने शिफारस केल्याप्रमाणे वित्त व लेखा विभागामध्ये संस्थात्मक संरचना यापुढे सिडको, म्हाडा आणि लेखा व कोषागरे संचालनालय यांच्या धर्तीवर करण्याचा प्रस्ताव आहे. कार्यकारी समितीच्या शिफारशीनंतर सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या व शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

**१२.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**<u>ठराव क्र.९८६</u>** :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या व शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे प्राधिकरणाच्या विचारार्थ खालीलप्रमाणे शिफारस करीत आहे :-

(१) वित्त व लेखा विभागाच्या कामात मोठया प्रमाणात वाढ झाली असल्यामुळे राष्ट्रीय उत्पादकता परिषद यांच्या शिफारशीनुसार उप-मुख्य लेखाधिकारी यांची दोन पदे (वेतनश्रेणी रु.१०६५०-३२५-१५८५०) नव्याने निर्माण करण्यात यावीत. प्राधिकरणातर्फे मेट्रो प्रकल्प व इतर प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत असल्यामुळे तसेच प्राधिकरणास आयकराची पूर्तता करावी लागत असल्यामुळे कनिष्ठ लेखा अधिकारी यांची तीन पदे (वेतनश्रेणी रु.६५००-२००-१०५००) नव्याने निर्माण करण्यात यावीत व ती आवश्यकतेनुसार भरण्यात यावीत.

(२) प्राधिकरणाच्या वित्त व लेखा विभागाचे Organisation structure यापुढे सिडको, म्हाडा आणि लेखा व कोषागार संचालनालय (डीएफटी) यांच्या धर्तीवर असावे.

(३) लेख्यासाठी, गुंतवणूकीसाठी व एमआयएससाठी स्वतंत्रपणे एक-एक सॉफ्टवेअर तयार करण्यात यावे. त्यासाठी आवश्यक असलेला खर्च प्राधिकरणाच्या निधीमधून करण्यात यावा."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

—— oooooooooooo ——